# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 16/08/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावरील मोहगाव येथे दिनांक 15/08/2021 चे 03:00 वा. ते 03.10 वा. दरम्यान आरोपी चालक/मृतक नामे– शाहरूख मोहम्मद जागीर मंसुरी, वय 23 वर्ष, रा. हलगलपुर जि. कानपुर ग्राम भोगलीपुर उत्तरप्रदेश याने त्याच्या ताब्यातील एमपी–09/जीएच– 7572 क्रमांकाच्या ट्रकमध्ये सोबत 1 वाहन चालकाला बसवुन जात असता आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडवर उभा असलेला एमएच– 34/एम– 6111 क्रमांकाच्या ट्रेलरला मागुन धडक दिली. या अपघातात आरोपी स्वतः चे जागीच मरण पावण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विक्की धिरेंद्रसिग हकीमसिंग यादव, वय 28 वर्ष, रा. ग्राम मोहमद पुर ता. पुखराया जि. कानपुर उत्तरप्रदेश यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय खंडारे मो. नं 9923159153 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील सोनोली गावाजवळ येथे दिनांक 15/08/2021 चे 19:30 वा. ते 19.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– देविदास दामुजी खांबलकर, वय 50 वर्ष, रा. सोनोली ता. काटोल हे शेतातुन त्यांची बैलबंडी व बैलबंडीला मागे बांधुन दोन गायी घेवुन त्यांच्या घरी सोनोली येथे जात होते. त्यादरम्यान सोनोली गावाजवळ काटोल कडुन सावरगाव कडे जाणारा एमएच– 40/एएन– 2709 क्रमांकाचा मोटरसायकल चालक आरोपी नामे– शुभम चंद्रभान उईके, वय 23 वर्ष, रा. शेंबडा याने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने चालवत आणुन बैलबंडीला मागे बांधलेल्या गाईला धडक मारुन जखमी केले व स्वतः चे मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 429, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण मो.नं. 9545363121 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील सावनेर बायपासरोड गुजरखेडी शिवार येथे दिनांक 11/08/2021 चे 16:00 वा. दरम्यान एम.पी– 28/सी.ए– 8319 क्रमांकाचा टाटा टीयोगा कारचा चालक आरोपी नामे– शिवम अर्जुन वर्मा, रा. इंदीरानगर, छिंदवाडा मध्येप्रदेश हा आपली कार मध्ये 2 लोंकाना बसवून सावनेर मार्गे नागपूर जात होता. त्यादरम्यान आरोपी कारचे चालकाने आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडचे मधात डिवायडर ला धडक दिली. या अपघातात कार मध्ये बसलेले राहुल सोमन भारती, वय 18 वर्ष, रा. शिवपुरी जि.छिंदवाडा, मध्यप्रदेश यास जखमी केले व स्वतः किरकोळ जखमी झाला. तसेच सोमन पलटु भारती, वय 50 वर्ष, रा. शिवपुरी जि. छिंदवाडा राज्य मध्येप्रदेश यास सुध्दा गंभीर जखमी केले असता त्याचे उपचारा दरम्यान मरण पावण्यास आरोपी कारणीभुत ठरला. संबधीत कागदपत्रे प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस उपनिरीक्षक श्री व्ही.जी.नोग यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री विनोद मांढरे मो. क्र. 9834222326 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 09 कि. मी. अंतरावरील पवनसुत पेट्रोलपंप जवळ नगरधन येथे दिनांक 15/07/2021 चे 16.30 वा. दरम्यान सौ. पिंकी रोशन चंदनबटवे(मृतक), वय 32 वर्ष, रा. नेहरू वार्ड (मेंठा) भंडरा जिल्हा ह.मु. म्हाळणी नगर नागपुर हि आपले पती सोबत त्यांच्या एमएच– 30/डी– 0983 क्रमांकाच्या मोटरसायकलने नागपुर वरून नगरधन मार्गे रामटेकला जात होती. त्यादरम्यान पवनसुत पेट्रोलपंप नगरधन जवळ डांबरी रोडावर मोटरसायकल अचानक स्लिप झाल्याने ती खाली रोडवर पडल्याने व दगडाचा डोक्याला जबर मार लागुन ती जखमी झाली. उपचाराकरीता तिला एसडीएच रामटेक येथे भरती केल्याने डॉक्टरांनी तपासुन तिला मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन बुधराम चंदनबटवे, वय 39 वर्ष, रा. नेहरू वार्ड (मेंठा) भंडरा जिल्हा ह.मु. म्हाळणी नगर, नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार काटे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर